# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोननं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक :- १३२-२२** **दिनांक :- ०९/०५/२०२२**

## अश्लील नृत्य करण्यास भाग पाडणा-या व प्रोत्साहन देणा-या नाईट सिटी ऑर्केस्ट्रा बारमधील २७ ईसमांवर कारवाई

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे अंतर्गत असलेल्या अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे अधिकारी यांना दिनांक ०८/०५/२०२२ रोजी बातमीदारामार्फत खात्रीशीर माहिती मिळाली की, नाईट सिटी ऑर्केस्ट्रा बार, पत्ता-मुंबई अहमदाबाद हायवे सर्विस रोडलगत, मिरागांव, काशिमिरा, ता. जि. ठाणे या बार आस्थापनेच्या हॉलमध्ये आस्थापनेचे मॅनेजर कम कॅशियर, कर्मचारी यांनी आपसांत संगणमत करुन बारमधील मुलींना नृत्य व अश्लिल नृत्य करण्यास भाग पाडून प्रोत्साहन देत आहे.

सदर मिळालेल्या बातमीप्रमाणे नाईट सिटी ऑर्केस्ट्रा बारवर छापा कारवाई केली असता सदर ठिकाणी आस्थापनेचा मॅनेजर, कॅशियर यांचेसोबत वेटर २० इसम तसेच तसेच उधळणाल्या जाणा-या चलनी नोटा गोळा करणारे नोकर, नृत्य करण्यास प्रोत्साहन देणारे व पैसे उपलब्ध करुन देणारे ७ इसम असे एकुण २७ आरोपी व पाहिजे आरोपी असलेले चालक तसेच मालक यांनी नाईट सिटी ऑर्केस्ट्रा बारमध्ये आपसात संगणमत करुन बारमधील मुलींना नृत्य व अश्लिल नृत्य करण्यास बंदी असतांना भाग पाडून प्रोत्साहित करतांना मिळून आले. सदर कारवाईमध्ये नमुद बारचा मॅनेजर/कॅशियर, तसेच इतर नोकर असे २० इसम व ७ ग्राहक अशा एकुण २७ आरोपीत यांना अटक करुन तसेच बारमध्ये उधळण्यासाठी वापरलेली एकुण रक्कम ६६९००/रु. जप्त करण्यात आली आहे. सदर कारवाईबाबत काशीमिरा पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि नं ३०२/२०२२ महाराष्ट्र हॉटेल, उपगृहे आणि मद्यपान कक्ष (बाररुम) यामधील नृत्य व अश्लिल नृत्यावर प्रतिबंध घालण्याबाबत व (त्यामध्ये काम करणा-या) महिलेंच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करण्याबाबत अधिनियम २०१६ चे कलम ३, ८ (१) (२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई डॉ. श्री. महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे पोलीस निरीक्षक श्री. देवीदास हंडोरे, मसपोनि. तेजश्री शिंदे नेमणुक-भरोसा सेल, पो.हवा.०२०१७/ पवन पो.हवा.९२००६/ पाटील, धनाजी इंगळे व पो.शि/०७१४८ अजय यादव यांनी केली आहे.

----ooo----